**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u>** - साहेबराव रामनाथ शैल्लार

**<u>वय</u>** - २९ वर्ष, **<u>पद</u>** - वनरक्षक

**<u>नेमणूक</u>** - खापा रेंज, कोरमेटा गेट, तह. सावनेर, जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>.**

दि. १४.०३.२०२५ रोजी लाकूड, तार बांबूच्या खुंटया जप्त केल्या. मला खुंटया दाखवण्यात आल्या. खुंटया, बांबू व तार दाखवण्यात आले. त्या त्याच आहेत. ते एम.ओ.क्र. ३, ४ व १ वर आहे. मला पोलिस पाटील ओमेश भिमटे यांनी साहेबांना वाघ मृत असल्याबाबत माहिती दिली. मी, गडलिंगे साहेब, आठवले साहेब, कुकलारे, डाखोरे साहेब असे आम्ही भनगाळा नाला येथे गेलो. तिथे मी पाहिले की एक वाघ मृत अवस्थेत पडला होता. त्याचे चारही पाय कापलेले होते, दात व मिशा काढल्या होत्या. वाघ उत्तर-दक्षिण अशा दिशेमध्ये पडला होता. वाघाचे मोजमाप केले असता त्याचे तोंडापासून शेपटीचे अंतर २९० से.मी. होते. त्याच्या बाजूला पळसाचे लाकूड, जळलेली तार पडली होती. प्रथम गुन्हा अहवाल मी बनवला. मला तो दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६२** देण्यात येते.

**२.** दि. १४.०३.२०२५ रोजी भनगाळा नाला येथे दुपारी २.३० वाजता वाघ मयत झाला तिथला मोक्का पंचनामा करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी, आठवले साहेब, गडलिंगे इत्यादी लोकांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. १४ वर आहे. दि. १४.०३.२०२५ रोजी ५० खुंटया, एक जळालेले तार व लाकूड जप्त केले. त्याचा जप्ती पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला.

त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६३** देण्यात येते.

**३.** दि. १५.०३.२०२५ रोजी मी, गडलिंगे, आठवले व इतर पोलिस व फॉरेस्टे स्टाफ, स्वान पथक असे आम्ही शासकीय वाहनाने तोरणी, बिछवा, मध्य प्रदेश येथे गेलो. त्याचा मोक्का पंचनामा केला. तो दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. १८ वर आहे.

**४.** दि. १७.०३.२०२५ रोजी पंढरी याचा अटक व अंगझडती पंचनामा केला. त्यात आरोपीचे कपडे जप्त केले. तो दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. ४२ वर आहे. किशोर भलावी याचा अटक व अंगझडती पंचनामा केला. त्यात आरोपीचे कपडे जप्त केले. तो दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. ४२ अ वर आहे. दि. १७.०३.२०२५ रोजी नंदू भलावी याच्याकडून रू. १२/- व मोटोरोला कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला होता. जप्ती पंचनामा करण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. ४४ वर आहे.

**५.** दि. १९.०३.२०२५ रोजी पंढरी कुंभरे याचा कबुली जबाब घेण्यात आला. त्याने जबाब दिली की, त्याने घटनास्थळी करंट लावला होता. त्याला घटनास्थळी नेले. तो आम्हाला एका झोपडीत घेवून गेला. तिथे त्याने खुंटया व ताराचे बंडल, जर्मनचे घमेले, गोणी दाखवली. मला गोणी दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **एम.ओ.क्र.१२** देण्यात येते. तीन तारेचे बंडल मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एम.ओ. क्र. ८ वर आहे. जर्मन घमेले मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एम.ओ.क्र. ७ वर आहे. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. तो नि.क्र. ४७ वर आहे. पंढरी कुंभरे याने त्याच्या घरी नेले. तेथे त्याने कु-हाड व चाकू दाखवला. तो जप्त केला. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास

**निशाणी क्र. ६४** देण्यात येते. दि. १९.०३.२०२५ रोजी राजू दरसमा याला अटक केली. त्याप्रमाणे अटक पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो निशाणी क्र. ४८ वर आहे. दि. २२.०३.२०२५ रोजी केलेल्या पंचनाम्याबाबत मला आठवत नाही. दि. २२.०३.२०२५ रोजी किशोर भलावी याच्याकडून बजाज कंपनीची मोटर सायकल जप्त केली. त्याबाबत जप्ती पंचनामा केला. त्याच्या क्र. एम.एच.४० बी.एस.६३३६ होता. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येते. दि. २२.०३.२०२५ रोजी नंदू भलावी याच्याकडून दोन सु-या जप्त करण्यात आल्या. त्या मला दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यास **एम.ओ.क्र. १३** देण्यात येते. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा केला. तो मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६६** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात विडोओ कॉन्फरंसद्वारा हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत**

**६.** मी घटनास्थळावर पी.ओ.आर. नोंदवला. मी वनक्षेत्रात होतो. घटनास्थळी येण्याकरिता दुपारेचे २.०० वाजले. घटना दि. १४.०३.२०२५ रोजी झाली. वाघ हा दि. १४.०३.२०२५ रोजी सकाळी मृत झाल्यानंतर मी दुपारी २.०० वाजातच्या दरम्यान घटनास्थळी पोहचलो. वाघाची शेपटी किती लांब होती हे मला आठवत नाही. वाघाच्या समोरील पायाची लांबी, मागील पायाची लांबी, मागील व समोरील पायामधील अंतर, मागील पायाचे अंतर, समोरील पायाचे अंतर, कानाची लांबी, दोन कानामधले अंतर, मानेचा घेर, छातीचा घेर यांचे मोजमाप मी आता सांगू शकत नाही. मी पी.ओ.आर. स्वत: लिहिला. हे म्हणणे खरे आहे की,पळस लाकडाची गोलाई मी पी.ओ.आरमध्ये लिहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पी.ओ.आर.मधील कॉलम क्र. १७, १९ व २० मी रिकामे ठेवले आहे.

**७.** नि.क्र. १४ वरील मोक्का पंचनामामधील पंचांची नावे अमोल तुकाराम धुर्वे व अंकुश संपत परतेकी अशी आहेत. त्याचे जी.पी.एस. रिडींग २१, ३३, २५, ७८, ५८, १४ असे आहे. मृत वाघ नाल्याच्या आतमध्ये पडलेला होता. तो उत्तर-दक्षिण दिशेला पडला होता. सेंट्रींग तार किती मिटर लांब आहे हे माझ्या लक्षात नाही. काळया रंगाची प्लास्टीक तार किती मिटरचे आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सेंट्रींग तारचे ३ बंडल किती मिटर लांब आहे हे मी लिहिलेले नाही.

**८.** नि.क्र. ६३ वरील पंचनाम्यामधील वस्तू माझ्या ताब्यात आल्या. नि.क्र. १८ वरील पंचांची नावे रामा मडावी व कृष्णा अशी आहेत. प्राथमीक गुन्हा दि. १४.०३.२०२५ रोजी नोंदवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६.०९.२०२४ रोजीच्या घटनेचे वर्णन नि.क्र. १८ मधील पंचनाम्यात केले आहे. एम.एच.३१एफ.एक्स. ५४३९ बोलेरो व एम.एच.३१ डी.झेड ०६७९ हे शासकीय वाहनांचे क्रमांक आहेत. बिछवा येथील चौकीत सायंकाळी ५.०० ते ६.०० वाजता चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५.०३.२०२५ रोजी पंचनामा सुरू केला व दि. १६.०३.२०२५ रोजी पंचनामा संपला. दि. १६.०३.२०२५ रोजी लिहिलेली तारीख चुकून लिहिल्या गेली. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा कार्यालयात बसून लिहिला. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यातील शेवटचा परिच्छेद खरा आहे.

**९.** हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ४२ अ वरील पंचनामा खोटा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा कार्यालयात तयार केला व कपडे कार्यालयामध्ये जप्त केले. हे म्हणणे खरे आहे की, पंढरी कुंभरेच्या अंगावर काय खुणा होत्या हे मी सांगू शकत नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, किशोर भलावीच्या पॅन्टचे वर्णन व अंगावरच्या खुणा मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४४ वरील पंचनाम्यामध्ये मोबाईलचे आय.एम.ई.आय. नंबर लिहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनाम्यामध्ये रू.

१२/- न्यायालयासमक्ष हजर केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल हा कार्यालयात बसून जप्त केला.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. २४ वरील मेमोरेंडम पंचनामा व जप्ती पंचनामावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्वान पथकाचा पंचनाम्यामध्ये काही रोल नव्हता. सदर घटनास्थळाच्या पूर्वेला गजानन श्रीरामे यांची शेती आहे, पश्चिमेला लक्ष्मण येलमुले यांची शेती आहे, उत्तरेला नाला व दक्षिणेला रस्ता आहे. मी सदर घटनास्थळी सकाळी १०.३० ते ११.०० च्या दरम्यान पोहोचलो होतो. जप्तीनामा किती वाजता नोंदवला हे मला आठवत नाही.

**१२.** नि.क्र. ६४ वरील जप्ती पंचनामा दि. १९.०३.२०२५ रोजी केला. लोखंडी पात्याची लांबी, रूंदी ४३×१७×४ से.मी. अशी होती. हे म्हणणे खरे नाही की, मी लोखंडी पाता कार्यालयात बसून जप्त केला. हे म्हणणे खरे आहे की, रकाना क्र. १० रिकामा ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी न देता मुद्देमाल न्यायालयात हजर केला. हे म्हणणे खरे आहे की, जर्मन घमेले, लोखंडी तार जप्त केली त्यातील पंचनाम्यातील रकाना क्र. १० रिकामा ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मुद्देमालादेखील निशाण न लावता न्यायालयासमक्ष हजर केला आहे.

**१३.** राजू दरसमा याच्याकडून काय जप्त केले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, किशोर भलावी यांच्याकडून जप्त केलेल्या मोटर सायकलचा इंजिन क्रमांक मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त सु-यांची लांबी, रुंदी व त्या लोखंडाच्या आहेत हे लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सु-यांवर निशाण लावले नाही व पंचनाम्यातील रकाना क्र. १० रिकामा ठेवला. हे म्हणणे खरे नाही की, राजू दरसमा व मानिक सिलू यांनी माझ्यासमक्ष कोणताही कबूली जबाब दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांनी काय जबाब दिला हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २८ वर काय जबाब दिला आहे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील सर्व कार्यवाहया मी वनपरिक्षेत्रातील कार्यालयात बसून केल्या आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, मी वरील तारखांवर हजर असल्याबाबत कागदपत्र दोषारोपपत्रात दाखल केले नाही. मी दैनंदिनी दोषारोपपत्रात दाखल केली की कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वरील तारखांना कार्यालयात हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.02.03 17:34:06 +0530

सावनेर,
दिनांक ०३.०२.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe